# प्रकरण पाचवे

# 'अश्वदा' कादंबरीचे

# वाङ्मयीन मूल्यमापन

# प्रकरण पाचवे

## 'अश्वदा' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन

### वाङ्मयीन मूल्ये :-

कोणत्याही कादंबरीचा अभ्यास करत असताना त्या कादंबरीतील वाङ्मयीन मूल्यांचा अभ्यास करणे हे महत्त्वाचे ठरते. त्या कादंबरीचा दर्जा वाङ्मयीन मूल्यांवर ठरत असतो. साहित्यकृतीचे मूल्यमापन करताना जेव्हा केवळ वाङ्मयीन निकष वापरून काही निश्चित मते व्यक्त केली जातात. त्यातून त्या साहित्यकृतीचे वाङ्मय मूल्य लक्षात येते. नीतिनिरपेक्ष किंवा समाजनिरपेक्ष अशी वाङ्मयाकडे पाहणारी कलादृष्टी वापरून जे मूल्य ठरविले जाते. त्यालाच वाङ्मयीन मूल्य असे म्हटले जाते. म्हणजेच वाङ्मय मूल्यांचा विचार करताना केवळ वाङ्मयीन कसोट्यांचाच वापर केला जातो. सामाजिक बांधिलकी, मानवतावाद, जीवनमूल्ये यांचा इथे विचार केला जात नाही. कला ही मूलत: सौंदर्यनिर्मितीच्या हेतूने प्रकट होत असते. अशावेळी रसिकांनी काय किंवा समीक्षकांनी काय त्यातील सौंदर्याकडे जास्त लक्ष द्यावे. वाङ्मयात कलात्मकता जेवढी जास्त तेवढे ते वाङ्मय श्रेष्ठ, म्हणजेच त्याचे वाङ्मयीन मूल्य श्रेष्ठ असे म्हणता येईल. सौंदर्य रसरंजन व दृष्टी अशा चार प्रकारे कलात्म मूल्ये आविष्कृत होत असतात. त्यावरून त्या कलाकृतीचे वाङ्मयीन मूल्य ठरविता येते.

साहित्याचे साहित्यत्व ठरविणे आणि नंतर त्याची योग्यता आणि दर्जा ठरविणे यासाठी केवळ त्यातील वाङ्मयीन मूल्ये, समाजमूल्ये व जीवनमूल्ये स्वतंत्रपणे विचारात घेऊन चालणार नाही. म्हणूनच त्यांचा एकत्रित विचार करणे योग्य ठरते. कलामूल्ये ही साहित्याच्या अभिव्यक्तीशी निगडीत असतात. तर समाजमूल्ये आणि जीवनमूल्ये त्यांच्या आशयाशी निगडीत असतात. 'अश्वदा' या कादंबरीचा अभ्यास करत असताना अनेक वाङ्मयीन मूल्यांचा प्रत्यय आला. 'अश्वदा' कादंबरीतील वाङ्मयीन मूल्ये पुढीलप्रमाणे-

**कथासूत्र -**

या कादंबरीचा शिरोबिंदू असलेली माधवी गालवाची गुरूदक्षिणा पूर्ण करण्यासाठी तीन राजांकडे पुत्र होईपर्यंत राहते. गालवाला सहाशे अश्व मिळवून देते. कादंबरीत पात्रापात्रातील संवाद आले आहेत. कधी एकाच पात्राच्या मनातील स्वगतही आले आहे. कथानकात सर्व घटनाप्रसंग यांना घेऊन पात्रमुखी निवेदन केलेले आहे. त्यात वर्णने देखील आली आहेत. कथानकात ही सर्व प्रस्तुतिकरणे हातात हात घालून आल्यामुळे कथानक पुढे सरकते आहे. त्यामुळे कथा वाचताना वाचकांना उत्सुकता वाटते. वाचक त्या कथेशी एकरूप होतो. माधव, गालव, विश्वामित्र ही कथेतील बलस्थाने आहेत. त्यांच्या जीवनात त्यांना वेगवेगळ्या प्रसंगांना, आव्हानांना तोंड द्यावे लागत होते व त्यातून ते जसजसे पुढे जात होते. तसा कादंबरीचा विकास झालेला दिसून येतो. कथेचा प्रवास हा प्रारंभ-मध्य आणि शेवट याने होत असतो. प्रारंभी माधवीचे दान केले जाते. त्यानंतर मध्यभागी तिला तीन राजांकडे पुत्र होईपर्यंत रहावे लागते. कादंबरीच्या शेवटी माधवीला विश्वामित्रांपासून चौथा पुत्र होतो. मात्र चार पुत्रांची आई होऊन देखील तिला त्यांच्यापासून दूर जावे लागते. संध्या देशपांडे यांनी केलेला कादंबरीचा शेवट हा कथानकाला वैशिष्ट्यपूर्ण उंची देऊन गेलेला आहे.

**कादंबरीची वैशिष्ट्ये :-**

१) संध्या देशपांडे यांच्या 'अश्वदा' या पौराणिक कादंबरीतून पुराणकाळातील संस्कृतीचे चित्रण केले आहे.

२) 'अश्वदा' ही कादंबरी हेतूप्रधान असून या कादंबरीद्वारे संध्या देशपांडे यांनी पौराणिक काळातील स्त्रियांवर पुरूषप्रधान संस्कृतीमुळे होणारा अन्याय दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

३) 'अश्वदा' मधून पुरूष आपल्या स्वार्थासाठी, प्रतिष्ठेसाठी कसा दुसऱ्यांचा बळी देतो हे दाखवून देण्याचे कार्य केले आहे.

४) संध्या देशपांडे यांनी तत्कालीन संघर्ष व सद्यस्थितीतील संघर्ष यांच्यात जे साम्य आहे हे सांगण्यासाठी अश्वदाची निर्मिती हेतूपूर्वक केली आहे.

५) संध्या देशपांडे यांच्या 'अश्वदा' मधून त्यांच्याकडे असलेल्या कलात्मकतेची साक्ष पटते. त्यांच्या सामाजिक व चरित्रात्मक कादंबरीत आढळणारे सर्व गुण पौराणिक कादंबरीतही आढळतात.

६) संध्या देशपांडे यांच्या ह्या पौराणिक कादंबरीत सत्यधारित कल्पकता आहे.

७) अश्वदामध्ये उत्कटता आहे.

८) वातावरण निर्मिती व भाषाशैली या घटकांनी कादंबरीला जिवंतपणा प्राप्त करून दिलेला आहे.

अशाप्रकारे या कादंबरीत लेखिकेने साध्या-सोप्या भाषेत पात्रमुखी निवेदन केले आहे. वाचकाला एखाद्या प्रसंगाची उत्कंठा लावून ठेवणे, कुतूहलनिर्मिती करणे आणि तो प्रसंग प्रभावीपणे वाचकाच्या मनावर थेटपणे बिंबवणे अशा कौशल्याने कादंबरी वाचनीय झाली आहे. पौराणिक वास्तवाचा समर्थ आविष्कार घडविणारी ही कादंबरी आहे. वाचकांच्या मनाची पकड घेणारी कथा आहे.

**पात्रे**

'अश्वदा' या कादंबरीत संध्या देशपांडे यांनी वेगवेगळी प्रकरणे पाडली आहेत व त्यात प्रत्येक पात्राचा परिचय करून दिला आहे. त्यामुळे पात्र कसे आहे, त्याचा स्वभाव, कांदबरीतील त्याचे स्थान कोणते हे कादंबरी वाचन असताना लक्षात येते. प्रत्येक पात्राचा स्वत:चा असा वेगळा ठसा कादंबरीत उमटला आहे. पात्रांच्या तोंडचे संवाद वाचताना ते पात्र आपल्यासमोर हुबेहूब उभे राहते व तो प्रसंग आपल्यासमोरच घडतो आहे असे वाटतो. कादंबरीत मुख्य पात्रे प्रकरणे पाडून चित्रित केली आहेत तर काही गौण पात्रे मुख्य पात्रांबरोबर अधून-मधून डोकावून तीही महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात. उदा. बिंदुमती ही

एक दासी आहे. मात्र तिचीही भूमिका महत्त्वाची असलेली दिसून येते. प्रत्येक पात्र आपले वेगळे स्वभाववैशिष्ट्य घेऊन आले आहे. प्रत्येकाचे वेगवेगळे गुण लेखिकेने बारकाईने चित्रित केले आहेत. संवादाच्या माध्यमातून पात्र आपले विचार दुसऱ्यांपर्यंत पोहचविताना दिसते. तर मूक संवादातून त्याच्या मनातील विचार वाचकांपुढे आणण्याचा प्रयत्न संध्या देशपांडे यांनी केला आहे. माधवी ही या कादंबरीची नायिका आहे. हे पात्र अतिशय सुंदर पद्धतीने रेखाटलेले आहे. त्यामुळे हे पात्र वाचकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवून जाते. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करते. लेखिकेने पात्रांची निवड करताना समतोल साधला आहे. पात्रांमधील वैचारिक संघर्ष, त्यांचे जीवन, त्यांची कर्तव्यनिष्ठा, आज्ञाधारकपणा इ. पैलूंचे उत्तम चित्रण केले आहे.

विश्वामित्र हे पात्र सतत ज्ञानासाठी धडपडणारे आहे. आपले ज्ञान वृद्धींगत होण्यासाठी ते आपले राज्य, संसार सोडून तपश्चर्येला निघून जातात. ययाती आपल्या कन्येचे दान करतो त्यामुळे त्याच्या मनाला झालेल्या वेदना व मुलीचे काळजाला भिडणारे शब्द ऐकून तो हताश होतो हे लेखिकेने परिणामकारकतेने मांडले आहे. गालव हा आपल्या गुरूऋणातून मुक्त होण्यासाठी काय करतो व त्यासाठी त्याला कोणकोणत्या गोष्टींना सामोरे जावे लागते याचे चित्रण संध्या देशपांडे यांनी केले आहे. एक निष्ठावान शिष्य म्हणून गालव हे पात्र मनात घर करून राहते. या मुख्य पात्रांबरोबर अनेक गौण पात्रे कादंबरीत डोकावताना दिसतात. तीही महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात.

'अश्वदा' हे पात्र तिच्या तेजस्वितेने परखडपणामुळे प्रखर बुद्धिमत्तेमुळे सर्व सोसण्याच्या सोशिकतेमुळे वाचकांच्या मनात कायमचे ठसते. माधवीवर आलेल्या प्रसंगातून स्त्रीच्या मनातील भावना लेखिका वाचकांसमोर मांडताना दिसते. माधवीच्या मनातच नव्हे तर आतंरआत्म्यात एक प्रकारचा कल्लोळ चाललेला होता. कादंबरीत स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःख, प्रतारणा पात्रांच्या माध्यमातून लेखिकेने चित्रित केले आहे.

**भाषाशैली :-**

समाजाच्या तलावातच वाङ्मयाची, साहित्याची कमळे फुलत असतात. मातीशिवाय जसे फूल नाही तसे समाजाशिवाय साहित्य नाही. साहित्य समाजात उगवते. समाजातच फुलते अन् समाजालाच गंध देण्यात पूर्णता पावते. समाजातील विविध रंग वेचणे हेच साहित्यिकांचे कार्य असते. मग तो रंग कुठे गुलाबी, कुठे पांढरा, कुठे निळा तर कुठे रक्तासारखा लाल असतो. हे रंग वेचण्याचे सामर्थ्य कलावंताचे असते पण त्याला रंग आणि गंध देणारी माती ही समाजाची असते. ''जसा समाज तसे साहित्य'' असे शिवरामपंत म्हणतात ते खरेच आहे.

इंग्रजीमध्ये style हा जो शब्द वापरला जातो त्याला समानार्थक असा संस्कृतातील शब्द रीती हा होय. मराठी भाषेमध्ये style या शब्दाला प्रतिशब्द म्हणून भाषापद्धती, वळण, लेखनशैली किंवा भाषाशैली असे निरनिराळे शब्द वापरण्यात आले आहेत. म्हणजेच style म्हणजे शैली. प्रत्येक लेखकाची शैली ही भिन्न असते. समाजातील विविध रंग वेचताना समाजातील सुखदु:खाचा आविष्कार करताना ज्या एका विशिष्ट पद्धतीचा स्वीकार करून लेखन केले जाते त्याला शैली म्हणतात. साध्या-साध्या आशयाला नटवून सादर करण्याचे कार्य शैली करत असते. ही शैली लेखकपरत्वे भिन्न-भिन्न असते. लेखकाची जडणघडण, संस्कार, शिक्षण, वाङ्मयाची जाण, त्याला आलेला अनुभव, त्याचे ध्येय, त्याची जीवनमूल्ये, लेखनाचा उद्देश, त्याचा आर्थिक स्तर अशा अनेक घटकांचा परिणाम शैलीवर होत असतो.

शैली हा साहित्याचा पोषाख होय. पोषाखावरून माणूस जसा ओळखता येतो. तसे शैलीवरून लेखक ओळखता येतो. प्रत्येक लेखकाची विशिष्ट अशी शैली असते. ती शैली पुढे त्याचे अंगभूत वैशिष्ट्य बनून राहते. सावलीसारखी ती त्याच्याबरोबर राहते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ती एक भाग बनते. म्हणूनच ब्यूफोने 'शैली म्हणजेच लेखकच'

असे म्हटले आहे. प्रत्येक लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा शैलीवर उमटलेला असतो. अन् शैलीतून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज बांधता येतो. साहित्यकृतीतील अलंकार योजना लयबद्धता आणि लेखन प्रभावी करण्यासाठी योजिलेल्या क्लृप्त्या यांची समुच्चय योजना म्हणजे शैली होय. अशी व्याख्या प्रा.रा.ग. जाधव यांनी केली आहे. तर 'एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रूपामध्ये प्रकट करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्चयाची पद्धती म्हणजे शैली होय.' अशी व्याख्या भालचंद्र नेमाडे यांनी केली आहे. 'अनुरूप स्थळी अनुरूप शब्दार्थ जोडणे म्हणजे शैली' असाही एक विचार मांडला जातो. संस्कृत साहित्यशास्त्रातील रीती विचार हा शैलीशीच निगडीत आहे.

**भाषाशैलीची व्याख्या :-**

"अर्थ आणि ध्वनी या दोन अंगांची परस्पर अनुशक्ती म्हणजे सुंदर भाषाशैली."[१]

"एकाच पंचतत्त्वापासून बनलेल्या दोन मनुष्यांच्या आकृतीत ज्याप्रमाणे काहीतरी वेगळेपणा असतो; त्याप्रमाणे दोन साहित्य लेखकांच्या शब्दरचनेत काहीतरी फरक असतोच. अशा प्रकारची साहित्यातील शब्दरचनेची जी स्वयंविशिष्ट पद्धत तिला भाषाशैली असे म्हणतात."[२]

शब्दरूपी साधने कोशातून व भाषेतून सर्वांना सारखीच उपलब्ध असली तरी विशिष्ट मनोगत विशिष्ट तऱ्हेने व्यक्त करण्याला एखादा कवी आपल्या व्यक्तिमत्त्वानुरूप विशिष्ट पदरचना करीत असतो. या विशिष्ट पदरचनेला भाषाशैली म्हणतात. कादंबरीची भाषा अत्यंत साधी, सोपी आहे. कादंबरी पौराणिक असल्यामुळे काही तत्कालीन शब्दांची योजना केलेली दिसून येते. उदा. उत्तरीय, पौरोहित्य, पुरोहित, महामुनी, मदिरा, प्रतिहारी, प्रासाद, वामकुक्षी, सौधावर, पितामह, भ्राताश्री, मुनिवर, अश्व, पर्णकुटी, पुष्पवाटिका, गोमय, गोरस, पट्टराणी, हिरण्यगर्भ, पितांबर, कंचुकी असे अनेक शब्द योजले आहेत. कादंबरीची भाषा अत्यंत प्रवाही आहे. त्यामध्ये माधुर्य व प्रासादगुण आहेत. कादंबरीची भाषा प्रासादिक असल्यामुळे वाचकांना कादंबरी वाचत असताना उत्सुकता वाटते.

कादंबरीमध्ये विविध विधीच्या वेळी जे मंत्र म्हटले जात असत ते दिले आहेत ते मंत्र पुढीलप्रमाणे :-

**हिरण्यगर्भाला अर्घ्य देताना :-** "ॐ भू: भुर्व: स्व: तत्सवितुवरेण्यं भर्गोदेवस्थय धीमहि, धियो यो न: प्रचोदयात"[३] हा मंत्र म्हणत असत. आश्रमातदेखील या मंत्राचा उपयोग केला जात असे.

**दान विधी करताना :-** "मंत्र मध्ये, क्रियामध्ये, विष्णू स्मरणपूर्वकम् ।
यत् किंचित क्रियते कर्म तत कर्म सफलम् कुरू ॥"[४]

**कन्यादान करताना :-** "कन्यां कनकसंपन्नां कनकाभरणै युतां
दस्वामि विष्णवे तुभ्यं ब्रह्मलोक जिगुषया ।
विश्वंभर सर्व भूत सक्षिण्यं सर्व देवता इमां कन्या
प्रदास्यामि पितृणं, तरणायच ।"[५]

**अश्व दान करताना :-** "उच्चैश्रवास्त्वमश्वांनां राजा विजयकारक ।
सुर्यवाह नमस्तुभ्यमूमन: शान्तिप्रयच्छमें ॥"[६]
"महार्णवसमुत्पन्न उच्चै: श्रवसपुत्रक
मयात्वं गुरूमुख्याय दत्तो, सुखी भव"[७]

या मंत्राचा उपयोग करीत असत.

संध्या देशपांडे यांनी लेखनामध्ये मंत्राबरोबरच संस्कृत वाक्यांचा वापर केल्यामुळे कादंबरीला प्रगल्भता आली आहे. त्याचबरोबर वाचकांना त्याचा अर्थ कळावा म्हणून त्यांनी त्या वाक्यापुढे त्याचा मराठी अर्थ दिला आहे तो पुढीलप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| राजा वा एष याज्ञानां यदश्वमेध | - | सर्व यज्ञांचा राजा म्हणजे अश्वमेध [८] |
| आमनो भोगायतनमं शरीरम् | - | आत्म्याचे भोगस्थान म्हणजे शरीर [९] |
| अश्ववत तिष्ठति इति अश्वत्थ | - | अश्वाप्रमाणे तीन पाय स्थिर ठेवून चौथा पाय उचलून जो उभा असतो तो अश्वत्थ [१०] |

| | | |
|---|---|---|
| न श्व: इति अश्व: | - | जे आज आहे पण उद्या नाही ते म्हणजे अश्व [११] |
| कालयति आयु: | - | जो आयुष्य ग्रासतो तो काळ [१२] |
| स वा एष पुरूषोन्त रसमय: | - | सारे शरीरच अन्नरसमय आहे [१३] |
| कालयति सर्वाणि भूताणि | - | जो सर्वांचा नाश करतो तो काळ [१४] |

संस्कृत वाक्यांचा अर्थ दिल्यामुळे त्या वाक्यांचा अर्थ समजतो व त्यामुळे कादंबरी जरी पौराणिक असली तरी त्या काळची परिस्थिती कशी होती, त्यावेळच्या भाषेचा अर्थ वाचकांस समजतो.

'अश्वदा' कादंबरीमध्ये निसर्गाचे वर्णन अतिशय सुंदर रीतीने केले आहे. निसर्गाच्या सान्निध्यात राहत असताना माधवी गालवाला म्हणते, ''निसर्गाच्या सान्निध्यातला प्रत्येक क्षण किती सुसंस्कारित असतो नाही ? वाऱ्याचे वाहणे, फुलांनी सुगंध देणे, पक्ष्यांनी गाऊन वातावरणाला स्वभारित करणे, फळांचे पक्व होणे, मातीने, जलधारांना आपल्या ओट्यात आश्रय देणे, बियांचे रूपणे. यातली प्रत्येक गोष्ट स्नेह, प्रेम, मांगल्य, औदार्य यांचा एकेक संस्कार करणारी आहे.''[१५] त्याचवेळी गालवाला विश्वामित्रांचे शब्द आठवतात, ''निसर्ग हा मातृरूप आहे.'' गुरूदेव गालवाला नेहमी सांगत - ''निसर्ग हा मातृरूप आहे. चंद्र आणि सूर्य हे या मातृरूपाचे दोन स्तन आहेत. रात्र आणि दिवस हे दोन नेत्र. वृक्षवेली हे हस्त, पाद. पाणी म्हणजे स्तन्यस्त्राव, डोंगर म्हणजे नितंब, समुद्र म्हणजे नाभी, आकाश म्हणजे हृदय, श्वास म्हणजे भरती, नि:श्वास म्हणजे ओहोटी, जमीन म्हणजे योनी. ती गर्भ धारण करते. आकाशाने पेरलेली स्वप्ने स्वत:त रूजवते. त्या स्वप्नांना स्तनपान करवते. सूर्याचे तेज आणि चंद्राचे शीतलत्व देते. सगळ्या वेदना जखमा नाभीत साठवीत निसर्ग त्याचे मोती करतो. हिरे बनवतो. एकेका कारणाचा एकेक सुंदर मोती. एकेक चमकदार हिरा. मंथनातून बाहेर येते ते अमृत असते.''[१६] त्याचबरोबर पुढे गालव सांगतो, ''आई पोराला हृदयापाशी घेते, स्तनपान करविते, एका स्तनातून दूध, दुसऱ्यातून

पाणी. एक शरीर वाढवते. दुसरे वाढत्या शरीराची तृष्णा शमवते. वाढ जेवढी जास्त, तेवढी तृष्णा जास्त. आईला कळते हे . दिवसा दिसेलच पण रात्री दिसणाऱ्यालाही ज्ञाननेत्र तीच देते. वंशवृक्षाची वाढ आणि वेलीचा सांभाळ हे तिचे कार्य. तीच ते करू जाणे. कामिनीही तीच आणि दामिनीही तीच. ती असंख्य सुखदु:खाचे उमाळे, उसासे नाभीपल्याडच्या उदरात दडवते आणि आकाशासारखे आपले हृदय विशाल बनवते. शिशुजन्म ही तिची सिद्धी, तपश्चर्या. मातृरूपाला जेवढा निसर्ग आकलतो तेवढा योगी आणि तपस्वी यांनाही आकलत नाही. म्हणून ती निसर्ग जपते ......''[१७] विश्वामित्रांनी निसर्ग मातेसमान मानून त्याचे केलेले सुंदर वर्णन कादंबरीत संध्या देशपांडे यांनी रेखाटले आहे.

साधी, सोपी भाषा, संस्कृत वाक्यांची योग्य तेथे योजना व पौराणिक मंत्राचा यथायोग्य वापर यामुळे कादंबरीचे सौंदर्यमूल्य वाढले आहे. प्रत्येक पात्रांचा परिचय वेगवेगळ्या प्रकरणांच्या माध्यमातून आपल्याला होतो. त्यामुळे प्रत्येक पात्राचे स्वभाव कसे आहेत हे आपणास कळते. प्रत्येक पात्राच्या भावना आपल्या लक्षात येतात. संवादातून पात्रांच्या मनातील विचार एकमेकांना समजतात. प्रत्येकाच्या मनातील राग, द्वेष, दु:ख, प्रेम इ. चे दर्शन घडते. पात्रांच्या मनातील उद्रेक, घुसमट मूक संवादातून लेखिकेने यशस्वीरित्या चित्रित केले आहे.

कथानक, पात्रे, संवाद, शीर्षक, भाषा इ. चा विचार करता प्रस्तुत कादंबरी मनोवेधक, मनोरंजक तर आहेच परंतु ती पौराणिक कथानकाच्या माध्यमातून तत्कालीन स्त्री जीवनाचे दर्शन समग्रतेने घडविण्यात यशस्वी झालेली आहे. अश्वदा वाचल्यानंतर कितीतरी वेळ मन सुन्न होऊन जाते. एका राजकन्येच्या मूक व्यथेला जीवनकथेला मुखरित करण्याचे काम लेखिकेने मनोज्ञतेने केले आहे. त्यामुळे वाङ्मयीनदृष्ट्या कादंबरीचे मूल्य निश्चितच श्रेष्ठ आहे.

**संवाद :-**

निवेदनाचाच एक प्रकार म्हणून संवादाचा उपयोग केला जातो. वातावरण निर्मितीसाठी संवादाचा उपयोग केला जातो. चार्लस मार्गन या संदर्भात म्हणतात, ''कथानकाला गतीमान करणे, व्यक्तिदर्शन घडविणे आणि वातावरणनिर्मिती अथवा भाववृत्तीची निर्मिती करणे अशी संवादाची तीन कार्य असतात.''[१८] मराठी समीक्षक उषा हस्तक यांनी संवादाला मानवी जीवनाचे महत्त्वाचे अंग मानले आहे. या संदर्भात त्या लिहितात, ''व्यक्तीच्या गरजांमुळे सभोवतालच्या जगाशी त्याचे अपरिहार्य संबंध निर्माण होतात. व्यक्तींचे अनुभवविश्व संवादातून साकार होत असते. या संबंधामागचे हेतू व स्वरूपे विविध असतात. या सर्व संबंधांना जोडण्याचे प्रयोजन आणि मानवी स्वरूप व्यक्त करण्याचे सुलभ प्रभावी माध्यम म्हणजे संवाद होत. संवाद मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे.''[१९]

'अश्वदा' ही कादंबरी पौराणिक कादंबरी आहे. महाभारतातील प्रसिद्ध सम्राट ययाती याची कन्या माधवी हिच्या जीवनाची करूणगाथा आहे. हे एक व्यक्तिचित्रण आहे. व्यक्तिचित्रणात संवादाला विशेष महत्त्व आहे. प्रत्येकाची बोलण्याची शैली, ढब ही त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यांनुसार बनलेली असते. कथानक व व्यक्तिचित्रण ह्या दोहोंशी संवादांचा निकटचा संबंध असल्याने त्यांना विशेष महत्त्व असते. संवादांच्या माध्यमातून पात्रांना आपले हृदगत मोकळे करता येते. सरळसोट कथानिवेदनापेक्षा मधूनमधून संवाद आले तर त्यात वेधकपणा, चटकदारपणाव नाट्यात्मकता येते. त्याचबरोबर कथानकाला गती देण्याचे कामही संवाद करीत असतात.

'अश्वदा' ही पौराणिक कादंबरी असली तरी त्यातील काही संवाद हे पौराणिक भाषेत आहेत तर साधी भाषा वापरून व्यक्तींच्या मनातील विचार एकमेकांपर्यंत पोहचविण्यात आले आहेत. काही संवाद हे दोन व्यक्तींमध्ये झालेले आहेत तर काही

संवाद हे मूक संवाद असलेले दिसून येतात. मूक संवादामुळे व्यक्तीच्या मनात विचारांनी जी गर्दी केलेली असते ती मूक संवादातून वाचकांसमोर आलेली आहे. कादंबरीतील काही संवाद खटकेबाज आहेत. पात्रांच्या मुखातून येणारे संवाद त्यांच्या स्वभावाशी सुसंगत आहेत. त्यामुळे संवादाच्या माध्यमातून कादंबरी व व्यक्तिरेखा साकार होते, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

कादंरीतील संवाद आकर्षक आहेत, ओघवते आहेत. ते स्वभावदर्शक असून वातावरणनिर्मिती करणारे आहेत. माधवी विवाहयोग्य झाली होती. तरीही आपल्या पित्यापुढे ती एखाद्या लहान बाळासारखी कोणत्याही गोष्टीसाठी हट्ट करत असे. एकदा माधवीच्या मनात आपल्यालाही माता असावी असे येते व ती ययातीला म्हणते, ''मी तातांची आहे पण मला माताही हवी तात. सांगा ना कुठे आहे माझी माता? कोण आहे माझी माता?''[२०] मात्र महाराजांना तिची थट्टा करावीशी वाटते व ते तिला म्हणतात, ''तुझी माता मला नैमिषारण्यात भेटली होती. मी तिच्याकडून तुला अश्व देऊन खरेदी केली.''[२१] या संवादातून पिता व पुत्री यांचे संबंध किती जिव्हाळ्याचे मैत्रीपूर्ण होते हे लक्षात येते, माधवी कोणत्याही गोष्टीसाठी तातांकडे हट्ट करे. माधवी व ययाती यांचे संवाद कादंबरीच्या कथानकाला पुढे प्रवाहित करतात.

ययाती महाराज पुरूकडे तारूण्य मागण्यासाठी जातात. त्यावेळी महाराज पुरूला म्हणतात, ''पुत्रा, मी तुझ्याकडे काही मागितले तर तू देशील ?''[२२] त्यावर पुरू म्हणतो, ''मी तुम्हांला काय देणार तात ? सारे तुमचेच आहे ! माझे फक्त आहे ते फक्त हे शरीर आणि तेही तुमचेच आहे.''[२३] त्यावर महाराज म्हणतात, ''पुत्रा, तुझे शरीरच मला हवे आहे. देशील ? मला हवे आहे तुझे तारूण्य !''[२४] यातून ययातीचे स्वार्थी मन व पुरूची पितृभक्ती व निस्वार्थी स्वभाव दिसतो. माधवीच्या तोंडचे संवाद हृदयाला भिडतात. महाराजांसाठी विदुषकाजवळ जेव्हा ती निरोप पाठविते त्यावेळी ती म्हणते, ''महाराजांना

म्हणावे, काशी विश्वेश्वराला आणि पंचमहाभूतांना साक्षी ठेवून ही माधवी आपल्याला अभिवचन देते आहे की पितृकुलाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी आपल्या शरीराच्या अणुरेणूंचे दान द्यायलाही ती तयार आहे.''[२५] त्याचबरोबर ती गालवाला म्हणते, ''दानात गालवमुनींना दिलेली एक स्त्री एवढीच प्रतिष्ठा आहे माझी.''[२६] आपले दान केल्यावर माधवीच्या मनात जे वादळ उठले आहे त्याचे अगदी यथार्थ दर्शन माधवीच्या बोलण्यातून घडते.

माधवी प्राजक्ताच्या झाडाखाली उभी असते. त्यावेळी विश्वामित्र तिला तिथे थांबू नकोस म्हणतात. कारण प्राजक्तावर सर्पही लुब्ध असतात. त्यावर माधवी मनाशीच म्हणते, ''आता सर्पांचे भय वाटत नाही मला विश्वरथ. कारण असंख्य सर्प आता माझ्या देहात दडले आहेत.''[२७] ती मनाशी बोलून विश्वामित्रांना म्हणते, ''या प्राजक्ताचे आणि माझे जुने ऋणानुबंध आहेत स्वामी. त्याची फुले त्याच्याजवळ राहत नाहीत. माझी मुले माझ्याजवळ राहिली नाहीत.''[२८] माधवीला पुत्र होईपर्यंत ज्यावेळी पर्णकुटीत ठेवले जाते त्यावेळी ती विश्वामित्रांना म्हणते, ''नरपशू आहात सारे नरपशू ! सारी पुरूष जातच पशू आहे. लचके तोडता येतात तुम्हाला. डागण्या देता येतात. फुंकर घालता येत नाही दु:खावर ! सगळ्यांनी माझे मन ओरबाडले. तू शरीरही ओरबाडलेस. तरी तुम्ही ब्रह्मर्षी, माधवी कुलटा !''[२९] माधवीचे दु:ख, तिची निराशा, तिची तडफड, तिची वेदना या संवादातून लेखिकेने समर्थपणे मांडली आहे.

माधवीला भेटायला दृषद्वती येते. त्यावेळी ती माधवीला म्हणते, ''आईपण म्हणजे फक्त मुलाला जन्म देणे नव्हे माधवी. तुला ठाऊक आहे तान्ह्या पोराच्या शरीराला किती सुरेख गंध असतो ते ? तो गंध असतो आईच्या स्तनांतून त्याच्या अंगावर ओघळणाऱ्या दुधाचा. त्याचे जावळ हुंगताना जी तृप्ती मिळते ती स्वर्गसुखाहूनही श्रेष्ठ असते. झोपेत तान्हुले जेव्हा असते ना तेव्हा आईचे हृदय कसे उचंबळून येते माहीत आहे तुला ? माझी आई सांगायची माधवी, पोराला दृष्ट दुसऱ्याची नाही लागत. दृष्ट आपलीच लागते.

पोराच्या आईची आणि माहीत आहे तुला, थोडेसे आजारी पडले ना तान्हुले की दूध नकोसे होते त्याला. मग दूधभारित त्या स्तनांचे ओझे वाटायला लागते आईला. कासावीस होतो आईचा जीव."[३०] स्त्रीला मातृहृदय असते. ती क्षणकालाची पत्नी असते तर अनंत काळाची माता असते, हे या संवादातून लेखिकेने सांगितले आहे. दृषद्वती माधवीच्या मुलाचा सांभाळ करणार होती. तरीही तिला आई झाल्यानंतर जे स्वर्गसुख मिळते त्याची अनुभूती होती. लेखिकेने याचे वर्णन अत्यंत तन्मयतेने केले आहे.

दिवोदास महाराज अनवलोपन विधी करण्यासाठी माधवीकडे येतात. त्यावेळी माधवी त्यांना म्हणते, "या सगळ्यांची काही आवश्यकता नाही महाराज. माझ्या उदरातला जीव वाढणे न वाढणे या संस्कारावर अवलंबून नाही हे आपणही जाणता. मनात आणलेत तरी आता त्याची वाढ थांबवणे तुमच्या हाती नाही."[३१] यातून माधवीची निराशा दिसून येते. त्यावेळी दिवोदास महाराज माधवीला म्हणतात, "कुठल्याच जीवाची वाढ मला थांबवायची नाही माधवी. जलतत्त्वांनी बनलेल्या शरीराच्या वरच्या भागाचा पाया असतो. अग्नितत्त्वांनी घडलेला शरीराचा खालचा भाग. हे शरीर म्हणजे अग्नी आणि पाऊस यांचे विलक्षण संमिश्रण आहे माधवी. एक भूक शमवते दुसरे भूक वाढविते. पण मी हे सारे तुला का सांगतो आहे ? तुझ्यासारख्या स्त्रीला याने काही फरक नाही पडायचा. अग्नी आणि पाऊस या साऱ्यापल्याड उभी आहेस तू. हा अनवलोपन संस्कार करून मला तुझे श्रेष्ठत्व नाकारायचे नव्हते. ज्या गोष्टीसाठी स्त्री आसुसलेली असते, त्या गोष्टीसाठी तू उतावीळ आहेस की नाही, एवढेच पाहायचे होते मला."[३२] पुढे ते म्हणतात, "आई आहेस तू तरी तुझ्यातला पाऊस तुला सापडलेलाच नाही माधवी. तुझ्यातल्या गर्भाला कदाचित नसेल कुठल्याच संस्कारांची आवश्यकता, पण तुझ्यातला पाऊस कोसळायला हवा माधवी. त्या धुवाधार पावसात तुझे चिंब भिजणे. तुझ्यातल्या आगीला थांबवू शकेल. कसला एवढा वणवा घेऊन जगते आहेस ? फेकून दे तो."[३३] यातून दिवोदास महाराज माधवीला तिच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

जीवनात आलेला वणवा उधळून देण्यास सांगतात. याचे चित्रण लेखिकेने समर्थपणे केले आहे. कादंबरीमध्ये संवादाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आकर्षक व उत्तम संवाद असल्यामुळे ते कादंबरीला बळकटी देतात.

**उद्देश :-**

साहित्यातील कोणतीही कलाकृती निर्माण होत असताना ती निर्माण करण्यामागे काहीतरी उद्देश हा असतोच. तो उद्देश सफल होण्यासाठी कादंबरीकार लेखन करीत असतो. 'अश्वदा' कादंबरी लिहिण्यामागेही लेखिकेचा उद्देश होता. त्यामुळे त्यांनी नाटकांकडून कादंबरी लिहणयकडे आपली लेखणी वळवली. आपल्या देशात पौराणिक कथांचे भांडार आहे. मात्र त्याकडे लेखकांचा कल फार कमी असलेला दिसून येतो. त्यामुळे आपल्याकडे पौराणिक साहित्य फार कमी प्रमाणात दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात तर हे साहित्य खूपच कमी होते. १९५० नंतर मात्र स्थिती बदललेली दिसते. जुन्या कथांवर नवे मुखवटे चढविण्याकडे भर दिला जाऊ लागला. वि.स. खांडेकरांनी १९९ मध्ये 'ययाति' ही कादंबरी लिहून या नव्या प्रवृत्तीला जन्म दिला. या कादंबरीला भरपूर यश मिळाल्याने पौराणिक विषयाकडे अनेक लेखकांचे लक्ष वेधले व त्यानंतर अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या.

संध्या देशपांडे यांची 'अश्वदा' हो पौराणिक कादंबरी आहे. पौराणिक कादंबऱ्यांचा प्रमुख उद्देश म्हणजे आजच्या जीवनातील परिस्थिती व समस्या यांची उत्तरे देण्यासाठी तिचा उपयोग केला जातो. स्त्री कितीही शिकली, सवरली तरी तिला पुरूषांच्या बंधनात राहून अन्याय सहन करावा लागतो. ही परिस्थिती जशी आजची आहे तशीच ती पौराणिक काळात देखील असलेली दिसून येते. हे लेखिकेने कादंबरीच्या माध्यमातून दाखविले आहे. या कादंबरीची नायिका माधवी ही महाभारततला प्रसिद्ध सम्राट ययाती याची एकुलती एक कन्या असते. माधवीचे आपल्या पित्यावर फार प्रेम होते. त्यांचाही तिच्यावर फार जीव होता. मात्र ते राजा किंवा पिता असो ते एक पुरूषच होते. आपली प्रतिष्ठा धुळीला मिळू नये म्हणून एका याचकाला आपल्या मुलीला दानात देऊन टाकतात. त्यामुळे

पूर्वीच्या काळीही स्त्रियांना पुरूषांच्या मतांप्रमाणेच वागावे लागत होते. पुरूषांचा आदेश स्त्रियांना मानावा लागत होता. स्त्रियाही नम्रपणे त्योचे म्हणणे काहीही विरोध न करता मान्य करत होत्या. माधवीनेही आपल्या पित्याचा निर्णय विरोध न करता मुकाटपणे मान्य केला. त्यानंतर तीन राजांकडे राहून त्यांना पुत्र देऊन त्या बदल्यात गालवाने सहाशे अश्व मिळविले. तरीही माधवीने आपले प्राक्तन समजून तो अन्याय सहन केला. पूर्वीच्या काळाप्रमाणे आजही स्त्री कितीही शिकलेली असली तरी, ती स्वत:च्या पायावर उभी राहून संसाराला बरोबरीने हातभार लावत असली तरी पुरूषांची सत्ता सर्वत्र असलेली दिसून येते. हे दाखविण्याचा प्रयत्न संध्या देशपांडे यांनी 'अश्वदा' या कादंबरीतून केला आहे. त्यांनी कादंबरीच्या सुरूवातीलाच 'पुरूषांचाच सोस आणि प्रकृतीचे सोसणे यांस' असे लिहून आपला उद्देश वाचकांपुढे ठेवला आहे. वसिष्ठ व विश्वामित्र यांच्या संघर्षात वर्गकलहाची बीजे लेखिकेला दिसली. ती मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. हा वर्गकलह त्याकाळी होताच पण आज आधुनिक काळातही तो वर्गकलह मिटलेला दिसून येत नाही. तो संघर्ष अजूनही चालू आहे. त्यामुळे समाजाची हानी होत आहे. तरीही हा संघर्ष कमी होत नाही. माधवी व विश्वामित्रांच्या निमित्ताने लेखिकेने महाभारतातल्या काही प्रकरणांना हात घालून त्याकाळची परिस्थिती, संस्कृती आपल्यासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. संध्या देशपांडे यांनी या कथेद्वारे समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शीर्षक :-**

कथा, काव्य, नाटक, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र या साहित्यप्रकारांमध्ये कादंबरी या साहित्यप्रकाराची व्याप्ती फार मोठी आहे. कादंबरीच्या घटकांमध्ये शीर्षक महत्त्वाचे असते. शीर्षक कादंबरीला समर्पक असावे लागते. शीर्षक आणि कथानक यांचा जवळचा संबंध असतो. कादंबरीच्या शीर्षकावर कादंबरीच्या लोकप्रियतेचा भाग अवलंबून असतो. शीर्षक आकर्षक असेल तर वाचक ती कादंबरी वाचण्यासाठी उत्सुकता दाखवतात. कथाशीर्षक कसे असावे यासंबंधी उषा गोखले म्हणतात, ''कथाशीर्षक म्हणजे वाचकाला

कथेकडे नेणारे जणू मार्गदर्शक फलकच ! सामान्यत: कथेचे शीर्षक कथेचा गाभा सूचित करणारे असावे, असे मानले जाते.''[३४] शीर्षक हे सूचक, आकर्षक, नावीन्यपूर्ण, योग्य आणि आटोपशीर असावे. शीर्षक हे आशयसूत्र व्यक्त करणारे असावे.

'अश्वदा' या कादंबरीचे शीर्षक समर्पक आहे. संध्या देशपांडे यांनी कथानकाला अनुरूप शीर्षक निवडले आहे. त्याचा कथानकाशी पूर्णत: संबंध जुळलेला दिसून येतो. 'अश्वदा' या शब्दावरून कादंबरीचा विषय हा अश्वांशी संबंधित असावा हे लक्षात येते. कादंबरीच्या कथानकात महाभारतातल्या ययातीची कन्या माधवीच्या जीवनातील प्रसंगाचे चित्रण लेखिकेने केले आहे. ययाती महाराजांकडे विश्वामित्रांचा शिष्य आठशे अश्वमेधी अश्वांची मागणे घेऊन येतो. ययाती महाराजांकडे देण्यासाठी आठशे अश्वमेधी अश्व नसतात. मात्र प्रतिष्ठानातून एक याचक रिक्त हस्ताने परत पाठविला म्हणून आपली प्रतिष्ठा धुळीला मिळेल असे ययातीला वाटू लागते. त्यासाठी याचकाला रिक्त हस्ताने न पाठविता आपली कन्या माधवी हिला गालवाला दानात अर्पण करतात व गालवाला सांगातात एखाद्या समर्थ राजास माधवीला देऊन त्याबदल्यात अश्व मिळवावेत. मात्र आठशे अश्व देणारा एकही राजा गालवाला सापडत नाही. त्यासाठी दोनशे अश्वांच्या बदल्यात एक पुत्र अशा तीन राजांकडे माधवीला ठेवण्यात येते व सहाशे अश्व मिळविले जातात. उरलेल्या दोनशे अश्वांच्या बदल्यात माधवीला तो आपल्या गुरूदेवांना अर्पण करतो. अर्थातच अश्व मिळविण्यासाठी माधवीची मदत गालवाला घ्यावी लागली. माधवीने अश्व मिळवून दिले. अश्व प्राप्त करून देणारी ती अश्वदा म्हणजेच माधवी ही अश्वदा ठरली आहे. म्हणून कादंबरीचे शीर्षक समर्पक आहे. योग्य अशा शीर्षकामुळे कादंबरी उठावदार झालेली आहे. कादंबरीच्या शीर्षकातच तिचे यश लपलेले असते. त्यामुळे हे शीर्षक कादंबरीच्या यशाला कारणीभूत ठरलेले आहे. कादंबरीच्या माध्यमातून लेखिकेने स्त्री मनाची आंदोलने अगदी समर्पक शब्दांत मांडलेली आहेत. कथेचे शीर्षक सार्थ असून कथासूत्राला साजेसे आहे. कथेतील वातावरण, संवाद व पात्रांचे चित्रण वास्तव आहे.

# संदर्भ सूची


१) फडके ना.सी.,
लघुकथा : मंत्र आणि तंत्र,
मुंबई, १९५२,
पृ.क्र. १५२.

२) मुजुमदार गो.गो.,
मराठीची सजावट,
भाग दुसरा,
पृ.क्र. ३८.

३) देशपांडे संध्या-अश्वदा,
मेनका प्रकाशन, पुणे,
आवृत्ती पहिली, २००६,
पृ.क्र. १९०.

४) तत्रैव पृ.क्र. ४०.

५) तत्रैव पृ.क्र. ४२, ४३.

६) तत्रैव पृ.क्र. २३९.

७) तत्रैव पृ.क्र. २४०.

८) तत्रैव पृ.क्र. १६.

९) तत्रैव पृ.क्र. ६३.

१०) तत्रैव पृ.क्र. ११०.

११) तत्रैव पृ.क्र. ८७.

१२) तत्रैव पृ.क्र. १७९.

१३) तत्रैव पृ.क्र. १०८.

१४) तत्रैव पृ.क्र. १७९.

१५) तत्रैव पृ.क्र. १२९.

१६) तत्रैव पृ.क्र. १२९.

१७) तत्रैव पृ.क्र. १२९, १३०.

१८) Morgaon Charles Dialogue,
In Novels and Plays
Page No. 1.

१९) हस्तक उषा,
मराठी कादंबरीतील संवाद,
सत्यकथा,
नोव्हेंबर, १९६३,
पृ.क्र. २६.

२०) देशपांडे संध्या,
अश्वदा,
उनि, पृ.क्र. १३.

२१) तत्रैव पृ.क्र. १३.

२२) तत्रैव पृ.क्र. २७.

२३) तत्रैव पृ.क्र. २७.

२४) तत्रैव पृ.क्र. २७.

२५) तत्रैव पृ.क्र. ४४.

२६) तत्रैव पृ.क्र. ४९.

२७) तत्रैव पृ.क्र. २४९.

२८) तत्रैव पृ.क्र. २४९.

२९) तत्रैव पृ.क्र. २५५.

३०) तत्रैव पृ.क्र. १४२.

३१) तत्रैव पृ.क्र. २१६.

३२) तत्रैव पृ.क्र. २१६.

३३) तत्रैव पृ.क्र. २१६.

३४) गोखले उषा,
य.ग. जोशी जीवन आणि वाङ्मय, पुणे,
१९८७,
पृ.क्र. १९८.